ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# शाश्वात ग्रामीण विकासातील समस्या आणि उपाययोजना

**प्रा. डॉ. सुनिल सखाहरी मोहटे**

*अर्थशास्त्र विभाग,*

*अगस्ति महाविद्यालय, अकोले.*

***Corresponding Author:* प्रा. डॉ. सुनिल सखाहरी मोहटे**

**DOI - 10.5281/zenodo.14875024**

**प्रस्तावना :**

भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी व्यवसाय आणि सहा लाखांपेक्षा अधिक असणारी खेडी हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा आत्मा आहे. वाढत्या औद्योगीकरण आणि शहरीकरणामुळे शहरी भागातील सर्वच प्रकारच्या सेवा सुविधांवर तान पडत आहे. शिवाय अनेक प्रकारच्या सामाजिक आर्थिक राजकीय सांस्कृतिक समस्या निर्माण होत आहेत. वाढती गुन्हेगारी गलिच्छ व त्या महिलांवरील अत्याचार, चोऱ्या, दरोडेखोरी, काळाबाजार इत्यादी सारख्या गंभीर समस्या निर्माण होऊन शहरी वातावरण गढूळ होत आहे. तर हवा पाणी ध्वनी सांस्कृतिक आणि जमिनीचे मोठ्या प्रमाणावरील प्रदूषण वाढवून विविध प्रकारचे साथीचे व गंभीर आजार वाढीस लागत आहेत. यामागील मूलभूत व मुख्य कारण म्हणजे रोजगार व उपजीविकेसाठी ग्रामीण भागातून शहरी भागाकडे लोकांचे होणारे मोठ्या प्रमाणावरील स्थलांतरण होय.

या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील लोकांना शहरी भागात मिळतात तशा प्रकारच्या सेवा सुविधा उपलब्ध करून देऊन ग्रामीण भागातच त्यांना राहण्यास पूरक ठरेल असा शाश्वत ग्रामीण विकास घडवून आणण्याची खरी गरज आहे. गाव खेड्यातील आर्थिक आणि सामाजिक व्यवस्था हळुवारपणे लोप पावत चाललेली आहे. गाव खेड्यांची निसर्गस्नेही रचना हा या ग्रामीण व्यवस्थेचा अविभाज्य भाग होता. ग्रामीण लोकांच्या सर्वच गरजा या व्यवस्थेच्या माध्यमातून पूर्ण केल्या जात होत्या परंतु अलीकडील काळात विकासाच्या नावाखाली ही व्यवस्था खिळखिळी झाल्यामुळे ग्रामीण लोकांच्या जीवनातील चैतन्य लोप पावत चालले आहे. म्हणून भारताच्या ग्रामीण भागाची निसर्गस्नेही रचना आणि आधुनिक आर्थिक विकास यांची सांगड घालण्यासाठी शाश्वत ग्रामीण विकासाची संकल्पना रुजवावी लागेल.

**शाश्वत विकासाची संकल्पना:**

संयुक्त राष्ट्र संघाने सन १९८७ साली जागतिक पर्यावरण आणि विकास आयोग स्थापन केला. या आयोगाच्या माध्यमातून भूतलावरील सामाजिक पर्यावरणीय समस्यांचे निरीक्षण करून त्यावर वास्तववादी उपाय करण्यासाठी आणि पृथ्वीवरील संसाधने पुढील पिढ्यांसाठी राखून ठेवून त्यांचा उपयोग चालू पिढ्यांसाठी शाश्वत रित्या कसा करता येईल यासाठी या आयोगाची स्थापना करण्यात आली.

**व्याख्या :**

"जो विकास चालू पिढीच्या गरजा पुढील गरजा धोक्यात न आणता पूर्ण करतो त्या विकासाला शाश्वत विकास असे म्हणतात." – (पर्यावरण आणि विकास जागतिक ब्रेंटलँड आयोग १९८७)

थोडक्यात वर्तमान काळातील गरजांची पूर्तता करत असताना या प्रयत्नांचा परिणाम भविष्यकालीन गरजांवर होणार नाही ही बाब विचारात घेऊन साध्य केलेला विकास म्हणजे शाश्वत विकास होय. शाश्वत विकासाची संकल्पना अतिशय व्यापक आहे. जो विकास मानवाच्या वर्तमान काळातील आणि भविष्य काळातील गरजांची संतुलित पुरती करतो तोच खरा शाश्वत विकास होय.

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

१. शाश्वत ग्रामीण विकासासाठी ग्रामीण विकासातील अडथळयांचा अभ्यास करणे.

२. शाश्वत ग्रामीण विकासासाठी उपाययोजनांचा अभ्यास करणे.

**अभ्यास पद्धती :**

सदर अभ्यासासाठी दुय्यम सामग्रीचा वापर केला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, शोध निबंध, शोध प्रबंध, मासिके, वर्तमानपत्रे व माहितीजाल यांचा वापर करून प्रस्तुत अभ्यासाची मांडणी करण्यात आली आहे.

**शाश्वत ग्रामीण विकासाची उद्दिष्टे :**

१. विकास प्रक्रियेत सातत्य राखणे.
२. विकासाची गतिमानता आणि दर्जा वाढविणे.
३. ग्रामीण विकासासाठी तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे.
४. पंचायतराज व्यवस्था बळकट करणे.
५. ग्रामीण भागातील साधन संपत्तीचे संरक्षण आणि संवर्धन करणे.
६. ग्रामीण भागातील लोकांच्या अन्न ऊर्जा स्वच्छ पिण्याचे पाणी आरोग्य शिक्षण इत्यादी सारख्या गरजा पूर्ण करण्यासाठी उपाययोजना करणे.
७. स्थानिक साधन संपत्तीचा वापर करून ग्रामीण लोकांना शाश्वत रोजगाराच्या संधी निर्माण करणे.
८. ग्रामीण भागातील सामाजिक सांस्कृतिक आणि निसर्गस्नेही वातावरण जतन व संवर्धित करणे.
९. स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी अनुकूल किंवा पोषक वातावरण निर्माण करणे.
१०. ग्रामीण भागातील शेतीसह सर्वच व्यवसायांचे बळकटीकरण करणे अंधश्रद्धा व्यसनमुक्ती हुंडाबंदी इत्यादी सारख्या अनिष्ट प्रथा रूढी परंपरा बंद करण्यासाठी व्यापक प्रबोधन व प्रयत्न करणे.

**शाश्वत ग्रामीण विकासातील अडथळे :**

**१. सुसंवादाचा अभाव :**

शाश्वत ग्रामीण विकासात ग्रामीण जनतेत असणारा सुसंवादाचा अभाव हे एक महत्त्वाचे कारण आहे. वेगवेगळ्या गावात जमिनीच्या हद्दीवरून बांधांवरून सामायिक रस्त्यावरून शेतकऱ्यांमध्ये वाद आहेत. अशा शेतकऱ्यांमध्ये सुसंवाद घडत नाही. कोणीही एकमेकांचे ऐकायला तयार नसते त्यामुळे गावात गटतट निर्माण होतात. त्याचा संपूर्ण गावाच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. गावाची संघटनात्मक शक्ती कमी होते.

**२. राजकारण :**

प्रत्येक गावामध्ये ग्रामपंचायत तसेच सहकारी संस्था या राजकारणाचा केंद्रबिंदू मानून गावागावात या संस्था आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी राजकीय पक्ष आपली ताकद पणाला लावतात. परिणामी खेडेगाव पातळीवर पक्षीय राजकारणाचा शिरका होऊन सत्ताधारी आणि विरोधी अशा दोन गटात संपूर्ण गावाची विभागणी होते. अशा प्रकारच्या सत्ता संघर्षामुळे ग्रामीण विकासाचे कळीचे प्रश्न मागे पडतात. शाश्वत ग्रामीण विकासात अडथळे निर्माण होतात.

**३. प्रशासकीय अडथळे :**

पंचायतराज व्यवस्थेतील खेडेगाव स्तरावरील ग्रामपंचायत ही ग्रामीण विकासाची प्रशासकीय व्यवस्था आहे. मात्र बऱ्याच गावांमध्ये सरकारी प्रशासकीय अधिकारी असणारा ग्रामसेवक आणि त्या गावाचा लोकनियुक्त असणारा सरपंच संगनमताने गावाचा कारभार करतात. त्यामुळे ग्रामीण विकासाबाबतच्या शासनाच्या योजना विविध शासन निर्णय, योजनाबाबतचे आदेश स्थानिक जनतेपर्यंत पोहोचत नाहीत. त्यामुळे या सर्वच प्रकारच्या शासकीय योजनांबाबत लोक अज्ञानी राहतात. परिणामी अपारदर्शक कारभाराविना ग्राम प्रशासनात अनियमितता, भ्रष्टाचार आणि एककल्लीपणा निर्माण होऊन शाश्वत ग्रामीण विकासात अडथळे निर्माण होतात.

**४. दिशाहीन युवाशक्ती :**

ग्रामीण विकासासाठी गावांमध्ये युवकांच्या रूपाने मोठी शक्ती उपलब्ध आहे. परंतु या युवाशक्तीला योग्य दिशा मिळत नाही. अनेक तरुण व्यसनाधीन झालेले दिसून येतात परिणामी अशा दिशाहीन युवाशक्तीचा मोठा अडथळा शाश्वत ग्रामीण विकासात निर्माण होत आहे.

**५. मानसिकतेचा अभाव :**

आपण ज्या गावात राहतो त्या गावाचा सर्वांगीण आर्थिक विकास व्हावा ही तीव्र मानसिकता ग्रामीण जनतेत दिसून येत नाही. सध्या सर्वत्र आत्मकेंद्रित जीवन जगण्याची पद्धती निर्माण होत असल्यामुळे सामाजिक आर्थिक जीवनात लोक सहभाग देण्याची प्रवृत्ती कमी होत आहे. ग्रामीण भागातील लोकांच्या मानसिकतेचे विविध पैलू असल्यामुळे आपल्या हक्कांबाबत, विकास योजनांबाबत लोकांमध्ये उदासीनता दिसून येते.

**६. तांत्रिक घटक :**

सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाची योग म्हणून ओळखले जाते. मात्र ग्रामीण भागात इंटरनेट, संगणक, स्मार्टफोन यावर आधारित डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करताना अनेक अडथळे येतात. माहिती तंत्रज्ञान वापरण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सोयी-सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. यासारख्या कारणांमुळे ग्रामीण विकासात अडथळे निर्माण होतात.

वरील सर्व अडथळ्यांचा विचार करता शाश्वत ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी पंचायतराज व्यवस्था आणि स्थानिक पातळीवरील सूक्ष्म नियोजन लोकसहभाग यांचे महत्त्व ग्रामीण जनतेला समजावून देणे गरजेचे आहे. सध्याच्या काळात ग्रामीण विकासासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करणे काळाची गरज आहे. शाश्वत ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी पुढील उपाययोजना करता येतील.

१. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी स्थानिक लोकांच्या मनात आमचं गाव आहे आणि गावाचा विकास म्हणजे आपला विकास आहे. ही भावना ग्रामस्थ व युवकांमध्ये रुजवावी लागेल यामुळे लोक संघटीत होऊन गावाची संघटनात्मक शक्ती वाढीस लागेल. ज्यामुळे लोक सहभाग वाढवून गावाचे मूलभूत प्रश्न सोडविता येतील.

२. स्थानिक लोकांच्या उपजीविकेच्या आणि सामाजिक संरक्षण देणाऱ्या योजनांमध्ये गरजू व पात्र लाभार्थींना सामावून घेता येईल. परिणामी गरिबीमुक्त गाव निर्माण होईल.

३. वैयक्तिक आणि सामूहिक उपक्रमांच्या माध्यमातून आर्थिक विकास आणि रोजगार निर्मितीच्या योजना तयार करता येतील.

४. शालेय शिक्षण सर्व मुलांना मिळवून देण्यासाठी गावातील १००% मुलांची शाळेमध्ये नोंदणी करणे व वेळोवेळी त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर लक्ष देणे.

५. ग्रामस्थांचे आरोग्य ठेवण्यासाठी सरकारच्या सार्वजनिक आरोग्य यंत्रणेचा प्रभावी उपयोग करून बालकांमधील कुपोषण महिला व मुलींचे आरोग्य बालमृत्यू व महात्मा मृत्यू साथीचे आजार वैद्यकीय सुविधा आणि आरोग्य चिकित्सा यासाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करणे.

६. ग्रामीण भागातील बालमजुरीचे निर्मूलन मुलांची शाळेमध्ये शंभर टक्के नोंदणी, बालविवाहाच्या प्रथेचे उच्चाटन, बाल हिंसाचारांचे उच्चाटन आणि सर्व गावकऱ्यांना निर्धोक सुरक्षित आणि स्वच्छ वातावरणाची हमी देणे.

७. जलसमृद्ध गाव निर्माण करून सर्वांसाठी पुरेसे स्वच्छ आणि पिण्यायोग्य पाणी उपलब्ध करून देणे. त्यासाठी पाण्याच्या स्त्रोतांची स्वच्छता, भुजल साठा वाढवण्यासाठी जलयुक्त शिवार योजना, विहीर पुनर्भरण, पाण्याचे प्रदूषण थांबवणे, सर्व नैसर्गिक जल स्त्रोतांचे जतन व संवर्धन करणे. या उपायांमुळे पिण्यासाठी व शेतीसाठी पुरेशे पाणी मिळेल व जलसमृद्ध गाव निर्माण होऊन शाश्वत विकास साध्य होईल.

८. निसर्ग संपन्न हरितगाव निर्माण करण्यासाठी स्थानिक पातळीवर रोपवाटिका तयार करून मोकळ्या व सार्वजनिक जागेवर वृक्षारोपण करणे. सामाजिक वरीकरणाद्वारे हरित क्षेत्रात वाढ करणे. याशिवाय पारंपारिक ऊर्जा साधनांकडून अपारंपारिक ऊर्जा साधने वापरास प्रोत्साहन देणे. आणि आपले गाव १०० % हागणदारीमुक्त कसे करता येईल या दृष्टीने ग्राम स्वच्छतेला प्राधान्य देणे.

९. स्वयंपूर्ण पायाभूत सुविधांयुक्त गाव निर्माण करण्यासाठी सर्वांना परवडणारी घरे, आरोग्य सुविधा, शैक्षणिक सुविधा, गावांतर्गत पक्के रस्ते, नळ पाणीपुरवठा, बंदिस्त गटार योजना, सौर पथदिवे, ग्रंथालय, क्रीडांगणे इत्यादी सुविधांची निर्मिती करणे.

१०. सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गावाच्या निर्मितीसाठी प्रत्येक व्यक्तीची काळजी घेतली जाते, अशी भावना स्थानिक लोकांच्या मनात निर्माण करणे आणि सर्व पात्र लाभार्थींना सामाजिक सुरक्षा योजनांचा फायदा मिळवून देणे.

११. शाश्वत ग्रामीण विकासासाठी स्थानिक नागरिक, तरुण मुले-मुली, स्वयंसहाय्यता गट, गावातील मंडळे, समित्या यांना विश्वासात घेऊन ग्रामपंचायत आणि ग्रामसभेच्या माध्यमातून ग्रामविकासाचे आराखडे आणि योजना तयार करून त्यांचा पाठपुरावा करणे.

१२. लिंग समभाव पोषक गाव स्थापन करण्यासाठी गावातील सर्व स्तरातील महिलांना समान संधी उपलब्ध करून देणे. त्याचबरोबर महिला सक्षमीकरण, महिला व मुलींच्या हक्कांचे रक्षण, सुरक्षित वातावरणाची निर्मिती करणे.

**सारांश :**

शाश्वत ग्रामीण विकासासाठी स्थानिक पातळीवरील गरजा लक्षात घेऊन या गरजांची पूर्तता करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करून त्या उपाययोजनांची पूर्तता करण्यासाठी सरकारच्या विविध पातळीवरील जसे कृषी यंत्रणा, कृषी सेवक, फलोत्पादन यंत्रणा, पाणलोटक्षेत्र विकास यंत्रणा, दुग्ध व पशुसंवर्धन यंत्रणा, न्याय यंत्रणा, पाणीपुरवठा योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, कृषी विज्ञान केंद्र, स्वयंसहाय्यता गट, महिला बचत गट, महिला व बाल विकास विभागातील कर्मचारी व अधिकारी, पोलीस यंत्रणा, अर्थ विभाग, वन विभाग, विविध प्रकारच्या सामाजिक संघटना, शालेय व्यवस्थापन समिती इत्यादी सारख्या यंत्रणांचा प्रभावीपणे वापर करता येईल आणि आजच्या युगातील समृद्ध खेडी निर्माण करता येतील .

**संदर्भ :**

१. पवार किशोर आणि इत्तर, पर्यावरण विज्ञान, प्रगती बुक्स प्रा. लि.-२००५
२. http//www.sustainabledevelopment.com
३. दैनिक ॲग्रोवान